DAY — **13** SEAT NUMBER | | | | | | |

2025	II	28	1500	**J-348**	(M)

BOOK KEEPING & ACCOUNTANCY (50)

Time : 3 Hrs. **(12 Pages)** **Max. Marks : 80**

प्र. १. खालील सर्व उपप्रश्न सोडवा : **[२०]**

(अ) योग्य पर्यायांची निवड करून विधाने पुन्हा लिहा : (५)

(१) .... ही अदृश्य संपत्ती आहे.

(अ) ख्याती (ब) स्कंध

(क) रोख (ड) उपस्कर

(२) 'नफा न कमविणाऱ्या' संस्थेच्या खात्यासाठी उत्पन्नाच्या खर्चावरील अधिक्यास .... असे म्हणतात.

(अ) तूट (ब) नफा

(क) वाढावा (ड) तोटा

(३) संपत्तीच्या मूल्यात घट होते तेव्हा नफा-तोटा समायोजन खाते .... केले जाते.

(अ) नावे (Debited) (ब) जमा (Credited)

(क) अधिक (ड) समान

(४) विसर्जन खर्च हा .... खात्याला जमा केला जातो.

(अ) रोखीकरण (ब) रोख /बँक

(क) भांडवल (ड) कर्ज

(५) नोंदणी अधिकारी हा .... असतो.

(अ) सरकारी अधिकारी (ब) आहर्ता

(क) आदाता (ड) पृष्ठांकिती

(ब) खालील वाक्य पूर्ण करा : (५)

(१) व्यापार खाते .... खर्चाच्या आधारे तयार केले जाते.

(२) उत्पन्न-खर्चाचे खाते हे .... खाते आहे.

(३) मृत भागीदाराच्या वारसाचे खाते ताळेबंदात .... बाजूला दाखविले जाते.

(४) कायम ठेव (fixed deposit) खाते .... या गटात मोडते.

(५) जर भागीदाराने एखादी संपत्ती ठेवून घेतली असेल तर .... खाते नावे होते.

(क) गटात न बसणारा शब्द ओळखा : (५)

(१) मजुरी खाते, वेतन खाते, अधिकार शुल्क खाते, आयात शुल्क खाते

(२) यंत्र खाते, उपस्कर खाते, संगणक खाते, भाडे खाते

(३) सामान्य निधी खाते, धनको खाते, यंत्र खाते, भांडवल खाते

(४) नोंदणी अधिकारी, आहर्ता, आहार्यी, आदाता

(५) दर्शनी मूल्यावर, अधिमूल्यावर, कसरीवर, कर्जावर

(ड) खालील विधानांशी आपण सहमत आहात की असहमत आहात ते सांगा : (५)

(१) भागीदारी संस्था ही व्यापारी संस्था आहे.

(२) नफा न मिळविणे हा 'नफा न कमविणाऱ्या संस्थेचा' हेतू होय.

(३) निवृत्त भागीदाराला व्यवसायातून बाहेर जाणारा भागीदार (outgoing partner) असेही म्हणतात.

(४) नवीन भागीदाराच्या प्रवेशाच्या वेळी लाभाचे प्रमाण काढले जाते.

(५) वित्तीय विवरणात केवळ ताळेबंदाचा समावेश होतो.

प्र. २. श्री दीपक आणि श्री अभिषेक एक भागीदारीत ३ : १ या प्रमाणात नफा–तोटा विभागून घेणारे भागीदार आहेत. ३१ मार्च २०१९ रोजी त्यांचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे. **[१०]**

ताळेबंद

३१ मार्च, २०१९ रोजीचा

देयता	रक्कम (₹)	संपत्ती	रक्कम (₹)
भांडवल खाती :		जमीन व इमारत	३२,०००
श्री दीपक –	१,२०,०००	यंत्र व संयंत्र	६०,०००
श्री अभिषेक –	४०,०००	फर्निचर	२२,०००
सामान्य निधी	१६,०००	स्कंध	४०,०००
विविध धनको	८०,०००	विविध ऋणको	६४,०००
अधिकोष अधिविकर्ष	४२,०००	रोख	८०,०००
	२,९८,०००		**२,९८,०००**

१ एप्रिल २०१९ रोजी आदिनाथला खालील अटींवर भागीदारीत प्रवेश दिला :

(१) त्याने भांडवल ₹ ४०,००० आणि ख्याती ₹ २०,००० आणावे त्यासाठी त्याला भविष्यातील नफ्यात $\frac{१}{५}$ हिस्सा मिळेल.

(२) फर्निचर वर २०% घसारा आकारावा.

(३) स्कंधाचे मूल्य १०% ने वाढवावे.

(४) इमारतीचे मूल्य ५% ने वाढवावे.

(५) विविध ऋणकोवर ५% दराने संशयित बुडीत कर्ज निधीची तरतूद करावी.

(६) सर्व भागीदारांचे भांडवल खाते त्यांच्या नवीन नफा-तोटा विभाजनाच्या प्रमाणात रोखीच्या खात्याच्या माध्यमातून समायोजित करावी.

तयार करा :

(अ) पुनर्मूल्यांकन खाते

(ब) भागीदारांचे भांडवल खाते

(क) संस्थेचा नवीन ताळेबंद

किंवा

आदित्य, अजिंक्य आणि अरुण हे भागीदार असून ते ५ : ३ : २ या प्रमाणात नफा-तोटा विभागून घेतात. ३१ मार्च २०२० रोजीचा त्यांचा ताळेबंद खालील प्रमाणे आहे:

ताळेबंद

३१ मार्च, २०२० रोजीचा

देयता	**रक्कम (₹)**	**संपत्ती**	**रक्कम (₹)**
धनको	१०,४५०	रोख	३,८००
राखीव निधी	७,५००	ऋणको	९,०००
भांडवल खाती:		स्कंध	८,७५०
आदित्य	२१,०००	यंत्र	५०,०००
अजिंक्य	१८,५००	उपस्कर	२,५००
अरुण	१६,६००		
	७४,०५०		**७४,०५०**

१ एप्रिल २०२० रोजी अरुण पुढील अटींवर भागीदारीतून निवृत्त झाला :

(१) संस्थेच्या पुस्तकात ख्यातीचे मूल्य ₹ १०,००० लावावे.

(२) स्कंधाचे मूल्य १०%, उपस्काराचे ५% ने आणि यंत्राचे मूल्य १०% ने कमी करावे.

(३) ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधी निर्माण करा.

(४) धनकोंच्या राशी मधून ₹ १०० चे अपलेखन (written off) करण्यात यावे.

(५) अरुणला देय असलेली सर्व राशी त्याच्या कर्ज खात्याला वर्ग करावी.

तयार करा :

(अ) नफा-तोटा समायोजन खाते

(ब) भागीदारांचे भांडवल खाते

(क) नवीन संस्थेचा ताळेबंद

प्र. ३. शर्मिला, उर्मिला आणि लीला हे 'जीवन स्टोअर्स' या संस्थेचे भागीदार आहेत. ते अनुक्रमे २ : २ : १ या प्रमाणात नफा-तोटा वाटून घेतात, त्यांनी ३१ मार्च २०२० रोजी भागीदारी संस्था विसर्जित करण्याचे ठरविले. त्यांच्या भागीदारीचा त्याच दिवसाचा ताळेबंद खालील प्रमाणे होता: **[१०]**

ताळेबंद

३१ मार्च, २०२० रोजीचा

देयता	रक्कम (₹)	संपत्ती	रक्कम (₹)
भांडवल खाती :		ख्याती	४५,६००
शर्मिला-	२,२७,१६०	यंत्र	७३,०००
उर्मिला-	१,४४,०००	मोटारगाडी	१,६७,६००
लीला-	१,०८,०००	इमारत	१,०२,०००
धनको	२८,८००	गुंतवणूक	६२,४००
देय विपत्रे	२१,६००	ऋणको	३०,६००
		स्कंध	४५,०००
		बँक	३,३६०
	५,२९,५६०		**५,२९,५६०**

वरील तारखेला संस्थेचे विसर्जन झाले आणि संपत्तीचे रोखीकरण पुढील प्रमाणे करण्यात आले.

(१) शर्मिलाने इमारत ₹ १,२३,६०० ला ठेवून घेतली.

(२) उर्मिलाने ख्याती, स्कंध आणि ऋणको पुस्तकी मूल्याला ठेवून घेतले आणि धनको व देय विपत्राचे शोधन करण्याचे मान्य केले.

(३) मोटारगाडी आणि संयंत्राचे अनुक्रमे ₹ १,५१,०८०, ₹ ३१,६८० या मूल्याला रोखीकरण झाले.

(४) लीलाने गुंतवणूक ₹ ५५,४४० ला ठेवून घेतली.

(५) रोखीकरण खर्च ₹ ६,८०० आला.

तयार करा:

(अ) रोखीकरण खाते

(ब) भागीदारांचे भांडवल खाते

(क) बँक खाते

किंवा

कनिकाला मानसीचे ₹ २६,००० देणे होते. मानसीने कनिकावर ३ महिने मुदतीचे ₹ २१,००० चे विपत्र काढले आणि शेष रकमेचा ₹ ५,००० चा रेखांकित धनादेश मिळाला. विपत्र स्वीकारून मानसीकडे पाठविले.

त्याच दिवशी मानसीने कनिकाचे विपत्र बन्सरीला पृष्ठांकित केले. देय दिनांकाला बन्सरीने मानसीला विपत्र अनादरीत झाल्याचे व नोंदणी खर्च ₹ २८० केल्याचे कळविले. नंतर मानसीने कनिकावर १ महिना मुदतीचे नवीन विपत्र ज्यात नांदणी खर्च व व्याज ₹ ६५० समाविष्ट करून काढले. देय दिनांकाला धनादेशाद्वारे कनिकाने स्वीकृत विपत्राचे शोधन केले.

तयार करा :

(अ) मानसीच्या पुस्तकात रोजकीर्द नोंदी द्या.

(ब) कनिकाच्या पुस्तकात मानसीचे खाते.

प्र. ४. परिमल कंपनी लि. ने प्रत्येकी ₹ २० मूल्य असलेले १,००,००० पूर्वाधिकार भागांचे निर्गमन केले. त्यावर खालील प्रमाणे प्रतिभाग रक्कम देय आहे. **[८]**

अर्जासोबत	₹ ८
आवंटनावर	₹ ६
प्रथम याचना	₹ ४
अंतिम याचना	₹ २

कंपनीला सर्व भागांकरिता अर्ज प्राप्त झाले आणि सर्व रकमा मिळाल्या.

परिमल कंपनी लि. च्या पुस्तकात आवश्यक रोजकीर्द नोंदी द्या.

किंवा

संगणकीय लेखांकन प्रणालीचे (CAS) महत्त्व स्पष्ट करा.

प्र. ५. महेंद्र, सुरेंद्र आणि नरेंद्र हे भागीदार आहेत. ते नफा-तोटा ५ : ३ : २ प्रमाणात विभागून घेतात. त्यांचा ३१ मार्च २०१९ रोजीचा ताळेबंद खालील प्रमाणे : **[८]**

ताळेबंद

३१ मार्च, २०१९ रोजीचा

देयता	रक्कम (₹)	संपत्ती	रक्कम (₹)
भांडवल खाती :		स्कंध	१७,०००
महेंद्र	२३,०००	उपस्कर	१८,०००
सुरेंद्र	१५,०००	जमीन व इमारत	१६,०००
नरेंद्र	१२,०००	बँक	३७,०००
देय विपत्र	२,०००		
धनको	८,०००		
बँक कर्ज	१२,०००		
सामान्य निधी	१६,०००		
	८८,०००		**८८,०००**

दिनांक ३० जून, २०१९ रोजी नरेंद्र मृत झाला आणि भागीदारीच्या करारानुसार खालील समायोजन करण्याचा निर्णय घेतला.

(१) स्कंध, उपस्कर, जमीन व इमारतीचे पुनर्मूल्यांकन अनुक्रमे ₹ १६,७००, ₹ १६,२००, ₹ ३०,१०० ला करण्यात आले.

(२) संस्थेची ख्याती मागील चार वर्षाच्या सरासरी नफ्याच्या ३ पट ठरविण्यात यावी आणि ख्यातीतील नरेंद्रचा हिस्सा ठरविण्यात यावा. मागील चार वर्षाचा नफा :

१ ले वर्ष ₹ ३०,०००

२ रे वर्ष ₹ २५,०००

३ रे वर्ष ₹ २५,०००

४ थे वर्ष ₹ ४०,०००

(३) नरेंद्रचा नफ्यातील हिस्सा मागील वर्षाच्या नफ्याच्या आधारे त्याच्या मृत्यू दिनांकापर्यंत देण्यात यावा.

(४) नरेंद्रला ₹ १,२०० प्रमाणे दर महा वेतन दिले जात होते.

(५) भांडवलावर वार्षिक १०% दराने व्याज देण्याची तरतूद आहे.

(६) नरेंद्रच्या मृत्यूपर्यंतची त्याची उचल दरमहा ₹ ९०० होती.

तयार करा :

(अ) नरेंद्रचे भांडवल खाते. ते त्याच्या वारसाला दिल्या जाणाऱ्या रकमेने दाखवा.

(ब) कृती कार्य दर्शवा (working notes)

(i) नरेंद्रचा ख्याती मधील हिस्सा

(ii) नरेंद्रला त्याच्या हिश्श्याचा देय असलेला नफा

किंवा

(अ) खालील माहितीवरून चलअनुपाताची गणना करा. (४)

(i) एकूण संपत्ती = ₹ २२,०००

(ii) स्थिर संपत्ती = ₹ १०,०००

(iii) विनियोजित भांडवल = ₹ २०,०००

(ब) खालील माहितीच्या आधारे शुद्ध लाभ अनुपाताची गणना करा. (४)

(i) विक्री = ₹ ७६,०००

(ii) विक्री मालाची मूळ किंमत = ₹ ५२,०००

(iii) अप्रत्यक्ष खर्च = ₹ १२,०००

प्र. ६. भानुबाई महिला सेवा केंद्राचा १ एप्रिल, २०१९ रोजीचा ताळेबंद आणि ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे प्राप्ती आणि शोधन खाते खालील प्रमाणे देण्यात आलेले आहे. **[१२]**

ताळेबंद पत्रक

१ एप्रिल, २०१९ रोजीचा

देयता	रक्कम (₹)	संपत्ती	रक्कम (₹)
भांडवल निधी	४०,०००	यंत्र	१०,०००
अदत्त खर्च :		उपस्कर	२०,०००
मजुरी	८,०००	सरकारी रोखे	६,५००
विद्युत	७,०००	अप्राप्त वर्गणी	८,५००
स्टेशनरी	१,०००	बँकतील रोख	१०,०००
		हस्तस्थ रोख	१,०००
	५६,०००		**५६,०००**

प्राप्ती आणि शोधन खाते

३१ मार्च, २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता

नावे **जमा**

प्राप्ती	**रक्कम (₹)**	**शोधन**	**रक्कम (₹)**
शिल्लक पुढे आणली :		विद्युत खर्च	२५,०००
हस्तस्थ रोख	१,०००	मजुरी	२२,०००
बँकेतील रोख	१०,०००	लेखन सामग्री	३,०००
वर्गणी :		भाडे आणि कर	११,८००
२०१८-१९ २,०००		प्रवास खर्च	८,०००
२०१९-२० ४५,०००		शिल्लक पुढे नेली :	
२०२०-२१ ३,०००	५०,०००	हस्तस्थ रोख	४,०००
प्रवेश शुल्क	२८,०००	बँकेतील रोख	२०,२००
इतर प्राप्ती	५,०००		
	९४,०००		**९४,०००**

अतिरिक्त माहिती :

(१) मजुरीचे ₹ ४५० देणे आहेत.

(२) प्रवेश शुल्काचे भांडवलीकरण करा.

(३) उपस्करावर वार्षिक १०% दराने घसारा आकारा.

(४) वर्ष २०१९-२० च्या वर्गणीचे ₹ ३,००० येणे बाकी आहेत.

तयार करा :

(अ) ३१ मार्च २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाचे उत्पन्न खर्च खाते

(ब) ३१ मार्च २०२० रोजीचे ताळेबंद.

प्र. ७. राजन आणि रोहित समान प्रमाणात नफा-तोटा वाटून घेणारे भागीदार आहेत. खालील माहितीच्या आधारे ३१ मार्च, २०२० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता नफा-तोटा खाते आणि त्याच तारखेचा ताळेबंद तयार करा : **[१२]**

परीक्षा सूची

३१ मार्च, २०२० रोजीची

नावे शिल्लक	**रक्कम (₹)**	**जमा शिल्लक**	**रक्कम (₹)**
विमा	३०,०००	भांडवल खाती :	
जमीन आणि इमारत	१,००,०००	राजन	१,००,०००
[१ जुलै, २०१९ रोजी		रोहित	१,००,०००
₹ ४०,००० ची वाढ]		१०% बँक कर्ज	६०,०००
वेतन	१०,०००	[१ ऑक्टोबर २०१९	
निर्यात कर	५,०००	रोजी घेतले]	
व्याज	२,०००	देय विपत्र	१९,०००
उपस्कर	८०,०००		
ऋणको	५२,०००		
	२,७९,०००		**२,७९,०००**

अतिरिक्त माहिती :

(१) ढोबळ नफा ₹ ६९,०००.

(२) विमा १ एप्रिल २०१९ पासून १५ महिन्याकरिता दिला आहे.

(३) जमीन व इमारतीवर वार्षिक १०% दराने तसेच उपस्करावर वार्षिक ५% दराने घसारा आकारा.

(४) बुडीत कर्ज ₹ २,००० अपलेखित करून विविध ऋणकोवर ५% प्रमाणे बुडीत व संशयित कर्ज निधीची तरतूद करा.

(५) संवरण स्कंधाचे मूल्य ₹ ६९,०००.

◆◆◆